kids around the world™

KIDStory™

# येशूची गोष्ट

## पाठ 1–10

"एक पीढी दुसऱ्या पीढीपुढे तुझ्या कृत्यांची प्रशंसा करीत राहील.
त्या तुझ्या पराक्रमाचे वर्णन करतील"
(स्तोत्रसंहिता 145:4).

# लहान लेकरांसाठी गोष्टींची रचना :

लहान लेकरांच्या गोष्टीचे खालील भाग आहेत. प्रत्येक गोष्टीचे हे मूलभूत भाग असतील जे एका भागापासून दुसऱ्या भागाकडे जाण्यासाठी मार्गदर्शन करतील.

- **उजळणी :** आधी शिकवलेल्या प्रकरणांची उजळणी करणे नेहमीच चांगले असते. आधीच्या प्रकरणात देवाने लेकरांना जे काही दाखवले त्याचे लेकरांनी लागूकरण केले की नाही हे यामुळे कळते. ह्या पद्धतीने लेकरांना हे कळते की त्यांची स्वतःची गोष्ट ही देवाची गोष्ट कशी आहे आणि प्रत्येक गोष्ट ही एकमेकांशी कशी जोडलेली आहे.
- **सुरूवात :** ही खास एकमेकांमध्ये गुंतून जाण्याची वेळ आहे व आपल्या वैयक्तिक गोष्टी सांगण्याची वेळ आहे. ती एखादी कृती किंवा प्रश्न असू शकतो की जो प्रत्यक्षपणे गोष्टीशी संबंधित नसतो परंतु तो तुम्हांला गोष्टीकडे घेऊन जातो.
- **ओळख किंवा पार्श्वभूमी :** लेकरांना गोष्ट ऐकण्यासाठी तयार करण्यासाठी हे गोष्टीच्या आधीचे विधान असते. लेकरांना गोष्ट समजण्यासाठी पार्श्वभूमीची काही माहिती देणे आवश्यक असते. ही माहिती लेकरांना गोष्टीकडे घेऊन जाते.
- **संपूर्ण गोष्ट सांगणे :** गोष्ट पवित्र शास्त्रातून आहे व ती खरी आहे हे सांगणे थोडे कठीण आहे. ह्या वेळी लेकरांचे पवित्र शास्त्र मिटलेले हवे आणि त्यांचे लक्ष फक्त गोष्ट ऐकण्याकडे व गोष्ट सांगणाऱ्याकडे हवे.
- **गोष्ट पुन्हा सांगणे :** वेगवेगळ्या कृती करणे महत्त्वाचे आहे जेणेकरून लेकरांना गोष्ट कळण्यास सुरूवात होईल. आणि लेकरे तीच गोष्ट पुन्हा आपल्या मित्रांना किंवा घरातील सदस्यांना सांगतील. लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल आणि लेकरू वाचू शकत असेल तर त्याला पवित्र शास्त्रातून गोष्ट वाचू द्या. शिक्षक क्रमाक्रमाने प्रश्न विचारू शकतात जेणेकरून लेकरे पवित्र शास्त्रात पाहून उत्तरे देऊ शकतील. तुम्ही इतरही काही कृती करू शकता ज्यामध्ये लेकरे वैयक्तिक रित्या किंवा गटाने भाग घेऊ शकतील. उदाहरणार्थ : एखादा खेळ किंवा एखादी कला सादर करणे इ.
- **प्रश्नांचा शोध आणि वैयक्तिक प्रतिक्रिया :** प्रश्न विचारणे आणि गोष्टीविषयी बोलता येणे शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये थोडे कठीण जाते. भावनांविषयी आणि अंतःकरणाविषयी न बोलता गोष्टीतील मुद्दे शिकवण्याची आपल्याला सवय झाली आहे. गोष्टीतील काही मुद्दे लक्षात ठेवण्यापासून पुढाऱ्यांनी लेकरांना देव त्यांच्या अंतःकरणात व जीवनात काय करत आहे याकडे लेकरांचे लक्ष वेधून घ्यायला हवे. प्रतिसाद म्हणून एक किंवा दोन प्रश्न विचारा आणि प्रार्थना करा की पवित्र आत्म्याने गटातील प्रत्येक लेकराशी बोलावे. अनेक अभ्यासक्रमांमध्ये एक लागूकरण असते जे आपल्याला प्रकरण जिथे घेऊन जाते तिथे घेऊन जाते. गोष्टीमध्ये ते वेगळे असते. लेकरांसाठी त्या गोष्टीचा काय अर्थ असणार आहे ते पवित्र आत्म्याने लेकरांशी बोलावे अशी आपली इच्छा असते. तुमच्या गटातील लेकरांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येणे ही काही फार असाधारण गोष्ट नाही. हे चांगले आहे! देवाने त्यांना सांगितलेल्या गोष्टीचे ते कसे आज्ञापालन करत आहेत याचा पुढील आठवड्यांमध्ये मागोवा घ्या.

# किड्स्टोरी – लेकरांसाठी येशूची गोष्ट

| | | |
|---|---|---|
| 1. | देवाची कृपा पावलेली | लूक 1:26-38 |
| 2. | येशूचे बालपण | लूक 2:41-52 |
| 3. | याईराची कन्या | लूक 8:40-42, 49-56 |
| 4. | अभिषिक्त | लूक 7:36-50 |
| 5. | लेकराचे जेवण | लूक 9:10-17 |
| 6. | ठेंगणा माणूस | लूक 19:1-10 |
| 7. | विधवेचे दोन पैसे | लूक 21:1-4 |
| 8. | शेवटले भोजन | लूक 22:7-23 |
| 9. | येशूची परीक्षा | लूक 23:13-25 |
| 10. | येशू जिवंत आहे! | लूक 23:39-24:7 |

# पाठ 1
# देवाची कृपा पावलेली

## लूक 1:26-38

### उजळणी :
ही तुमची गटाबरोबरची पहिली भेट असेल. प्रत्येक लेकराशी ओळख करून घ्या आणि त्यांना स्वतःबद्दल काय आवडते ते विचारा.

### सुरूवातीचा प्रश्न :
तुम्हांला आत्तापर्यंत मिळालेले सर्वांत मोठे आश्चर्य कोणते?

### पुन्हा गोष्ट सांगणे :
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

### वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे
**दोरखेळ :** एक 15 फूट दोऱ्याचा तुकडा घ्या. त्याला गाठ बांधा. लेकरांना गोलात उभे करा. त्यांना दोन्ही हातांनी दोर धरू दे. संगीत वाजू लागले की त्यांनी दोर त्यांच्या डावीकडील लेकराकडे पास करावा. संगीत थांबल्यावर जे लेकरू गाठीच्या सर्वात जवळ असेल ते गोष्टीत पुढे काय झाले ते सांगेल. गोष्ट पूर्ण सांगून संपेपर्यंत चालू ठेवा.

**मुलांसाठी**
**येशूची गोष्ट डीव्हीडी** : खंड 2

- सुरुवात 1:47
- शेवट 2:21

**ओळख :**
जरी देवाने आदाम व हव्वाला एदेन बागेतून बाहेर काढले तरी त्याचा अर्थ असा नव्हता की देवाची त्यांच्यावर प्रीती नव्हती. देवाची त्यांच्यावर व त्यांच्यानंतर येणाऱ्या प्रत्येक कुटुंबावर अद्भुत प्रीती होती. त्याची एवढीच इच्छा होती की त्याची प्रीती प्रत्येकाने ओळखावी व त्याचे अनुकरण करावे. परंतु प्रत्येकाने देवाचा आज्ञाभंग करणे चालूच ठेवले. लोकांनी त्याच्याकडे परत यावे म्हणून त्याने सर्व गोष्टी करण्याचा प्रयत्न केला, लोकांना पाळण्यासाठी नियम दिले, त्यांच्यावर राज्य करण्यासाठी राजे दिले, देवाचे विचार लोकांना सांगण्यासाठी तसेच देवाला अजूनही लोकांबरोबर राहायचे आहे हे सांगण्यासाठी लोक दिले. परंतु कशाचाही उपयोग झाला नाही. कालांतराने त्याच्याकडील सर्वांत मौल्यवान गोष्ट लोकांकडे पाठवण्याची त्याने तयारी केली. आणि जर ती गोष्ट सर्वांनी स्वीकारली तर ती त्यांच्यासाठी चांगली भेटवस्तू ठरणार होती. नाताळचा दिवस येत होता!

**टीप :**
**आजची गोष्ट कोणाबद्दल आहे हे सांगणारे एखादे साधे चित्र तुम्ही बरोबर घेऊन येऊ शकता. प्रत्येक आठवड्याला तुम्ही चित्रांची भर घालू शकता.**

***गोष्ट :***

*देवाने गालीलातील नासरेथ नावाच्या गावी मरीया नावाच्या कुमारीकडे गब्रीएल देवदूताला पाठवले. ती दाविदाच्या घराण्यातील योसेफ नावाच्या पुरूषाला वाग्दत्त होती.*

*देवदूत तिच्याकडे येऊन म्हणाला, हे कृपा पावलेल्या स्त्रिये, कल्याण असो, प्रभ*

*परंतु देवदूताने तिला जे काही सांगितले ते ऐकून तिच्या मनात खळबळ उडाली आणि त्याच्या अशा प्रकारे स्वागत करण्याचा अर्थ काय असेल याबद्दल आश्चर्य करत राहिली.*

*देवदूताने तिला म्हटले, मरीये, भिऊ नकोस, कारण देवाची कृपा तुझ्यावर झाली आहे. ऐक. तू गरोदर राहशील व तुला पुत्र होईल. त्याचे नाव येशू ठेव. तो थोर होईल व त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील. आणि प्रभू देव त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचे राजासन देईल व त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.*

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का?
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- देवाची इच्छा आहे की तुम्ही त्याच्या गोष्टीचा भाग बनावे जसे आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही होती. तुम्हांला काय वाटते की तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*मरीयेने देवदूताला म्हटले, हे कसे होईल? कारण मला पुरूष ठाऊक नाही.*

*देवदूताने मरीयेला उत्तर दिले, पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील. ह्या कारणाने ज्याचा जन्म होईल त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असे म्हणतील. पाहा, तुझ्या नात्यातली अलीशिबा हिलाही म्हातारपणी पुत्रगर्भ राहिला आहे आणि जिला वांझ म्हणत तिला हा सहावा महिना आहे. कारण देवाला काहीच अशक्य होणार नाही.*

*तेव्हा मरीया म्हणाली, पाहा, मी प्रभूची दासी, आपण सांगितल्याप्रमाणे मला होवो. मग देवदूत तिच्यापासून निघून गेला.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** 1 राजे 15:22

प्रभू येशू, आम्ही तुझे ऐकावे व तुझे आज्ञापालन करावे अशी तुझी इच्छा आहे हे आम्हांला माहीत आहे. तुझ्यावर किंवा इतर लोकांवर स्वतःचा ठसा उमटवण्याचा प्रयत्न न करता लेकरांनी तुझ्यावर भरवसा ठेवावा आणि तुझे आज्ञापालन करावे अशी इच्छा त्यांना देऊन तू त्यांना आशीर्वादित कर.

KIDStory™

kids around the world

# पाठ 2
# येशूचे बालपण

लूक 2:41-52

**उजळणी :**

ही तुमची गटाबरोबरची पहिली भेट असेल. प्रत्येक लेकराशी ओळख करून घ्या आणि त्यांना स्वतःबद्दल काय आवडते ते विचारा.

**सुरुवातीचा प्रश्न :**

तुम्हांला आत्तापर्यंत मिळालेले सर्वात मोठे आश्चर्य कोणते?

**पुन्हा गोष्ट सांगणे :**

लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

**वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे**

**दोरखेळ :** एक 15 फूट दोऱ्याचा तुकडा घ्या. त्याला गाठ बांधा. लेकरांना गोलात उभे करा. त्यांना दोन्ही हातांनी दोर धरू दे. संगीत वाजू लागले की त्यांनी दोर त्यांच्या डावीकडील लेकराकडे पास करावा. संगीत थांबल्यावर जे लेकरू गाठीच्या सर्वात जवळ असेल ते गोष्टीत पुढे काय झाले ते सांगेल. गोष्ट पूर्ण सांगून संपेपर्यंत चालू ठेवा.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**

**डीव्हीडी** : खंड 3

- सुरुवात 4:51
- शेवट 5:15

**ओळख :**

येशूचा जन्म जरी बेथलहेम येथे झाला, तरी त्याचे कुटुंब नासरेथ येथे स्थलांतरित झाले. येशू तुमच्यासारखाच लहान होता आणि तो तुमच्यासारखाच मोठा होत होता. (''तुम्ही कसे वाढत आहात,'' असे तुम्ही लेकरांना विचारू शकता.) वचन 4:40 सांगते, 'तो बालक वाढत वाढत बलवान होत गेला व ज्ञानाने पूर्ण होत गेला आणि त्याच्यावर देवाची कृपा होती.' दर वर्षी त्याचे कुटुंब वल्हांडण सण साजरा करण्यासाठी यरूशलेम येथे जात असे. खूप वर्षांपूर्वी देवाने त्यांचे कसे सामर्थ्याने तारण केले ह्याची आठवण म्हणून ते हा सण साजरा करत असत.
ते जवळजवळ एक आठवडा तेथे राहत असत आणि मग परत नासरेथ येथे येत असत. एका विशिष्ट वर्षी काय झाले ते आपण पाहूया.

***गोष्ट***

*येशूचे आईवडील दर वर्षी वल्हांडण सणास यरूशलेमेस जात असत. तो बारा वर्षांचा झाला तेव्हा ते त्या सणातील रिवाजाप्रमाणे तेथे गेले. मग सणाचे दिवस संपल्यावर ते परत जाण्यास निघाले. तेव्हा तो मुलगा येशू मागे राहिला हे त्याच्या आईबापांना कळले नाही. तो वाटेच्या सोबत्यांबरोबर असेल असे समजून ते एक दिवसाची वाट चालून गेले. नंतर नातलग व ओळखीचे ह्यांच्यामध्ये त्यांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. परंतु तो त्यांना सापडला नाही. म्हणून ते त्याचा शोध करत करत यरूशलेमेस परत गेले. तीन दिवसांनंतर तो त्यांना मंदिरात गुरूजनांमध्ये बसून त्यांचे भाषण ऐकताना व त्यांस प्रश्न करताना सापडला. त्याचे बोलणे जे ऐकत होते, ते सर्व त्याच्या बुद्धीवरून व उत्तरांवरून थक्क झाले.*

**टीप :**
**ही गोष्ट सांगत असताना तुमची कल्पनाशक्ती वापरा. गोष्टीतील व्यक्तीरेखांबरोबर तुम्ही आहात असे सोंग घ्या. तुम्ही काय पाहाता, ऐकता? तुम्हांला काय वाटते? तुम्हांला कशाचा वास येतो?**

©Kids Around the World 2014

**प्रश्नांचा शोध :**

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

**वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :**

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- देवाची इच्छा आहे की तुम्ही त्याच्या गोष्टीचा भाग बनावे जसे आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही होती. तुम्हांला काय वाटते की तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

***कथा पुढे चालू...***

*त्याला तेथे पाहून त्यांना आश्चर्य वाटले आणि त्याची आई त्याला म्हणाली, बाळा, तू आमच्याबरोबर असा का वागलास? पाहा तुझा पिता व मी कष्टी होऊन तुझा शोध करत आलो.*

*येशू त्यांना म्हणाला, तुम्ही माझा शोध करत राहिलात हे कसे? माझ्या पित्याच्या घरात मी असावे हे तुमच्या ध्यानात आले नाही काय?*

*मग तो त्यांच्याबरोबर खाली नासरेथास गेला व त्यांच्या आज्ञेत राहिला. त्याच्या आईने ह्या सर्व गोष्टी आपल्या मनात ठेवल्या. येशू ज्ञानाने, शरीराने आणि देवाच्या व माणसांच्या कृपेत वाढत गेला.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** लूक 2:49

परमेश्वरा, एक तरूण मुलगा म्हणून येशू कसा वाढला याचे उदाहरण दिलेस म्हणून तुझे आभार मानतो. लेकरांना तुझ्या ज्ञानाने आणि तुझ्या व माणसांच्या कृपेत वाढण्यास मदत कर. प्रत्येक लेकराला अशी इच्छा देऊन आशीर्वादित कर की त्यांनी तुझ्याबरोबर पित्याच्या घरात असावे.

# पाठ 3
# याईराची कन्या
## लूक 8:40-42, 49-56

**उजळणी :**
एखाद्या लेकराला येशू मुलगा असतानाची गोष्ट सांगता येते का ते पाहा. तुम्ही कसे येशूसारखे आहात?

**सुरुवातीचा प्रश्न :**
तुम्ही फार आजारी कधी होता ते सांगा.

**पुन्हा गोष्ट सांगणे :**
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

**वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे**
**रंगाकृती :** लेकरांना गोष्टीतील सर्वात जास्त आवडलेल्या भागाचे चित्र काढू द्या. त्यांनी काय काढले आहे ते त्यांना सांगू द्या.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**
**डीव्हीडी** : खंड 4

- सुरुवात 10:12
- शेवट 12:01

**ओळख :**
येशू अनेक चमत्कार करत आहे. अनेक आजारी लोकांना आरोग्य मिळत आहे. दुष्टात्मे आता लोकांना त्रास देऊ शकत नाहीत. तरीही येशूला देवाने पाठवले आहे यावर अनेक धार्मिक पुढारी विश्वास ठेवत नाहीत. आपण आज अशाच एका धार्मिक पुढाऱ्याला भेटणार आहोत. तो सभास्थानामध्ये काम करतो. आपण जशी मंडळीमध्ये देवाची उपासना करतो, तसेत यहूदी लोक सभास्थानात देवाची उपासना करतात.

***गोष्ट :***
*येशू जेव्हा गालीलात परत आला तेव्हा लोकसमुदायाने त्याचे स्वागत केले कारण ते सर्व त्याची वाट पाहात होते. तेव्हा पाहा, याईर नावाचा कोणीएक मनुष्य आला. तो सभास्थानाचा अधिकारी होता. तो येशूच्या पाया पडला व म्हणाला, ''आपण माझ्या घरी यावे. माझी एक सुमारे बारा वर्षांची मुलगी आहे. ती मरणास टेकली आहे.''*

**टीप :**
**तुम्ही गोष्ट सांगत असताना प्रेक्षकातील कोणाला तरी गोष्टीतील भाग प्रत्यक्ष सादर करू द्या. त्याने प्रभाव पडेल.**

*येशू त्याच्या मार्गावरच होता तेव्हा याईराच्या घरातून कोणी येऊन त्याला सांगितले, ''तुमची मुलगी मरण पावली आहे, आता गुरुजीला श्रम देऊ नका. हे ऐकून येशू याईराला म्हणाला, रडू नका, कारण ती मेली नाही, झोपेत आहे.''*

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*नंतर त्याच्या घरी आल्यावर त्याने पेत्र, योहान, याकोब व मुलीचे आईबाप ह्यांच्याशिवाय आपल्याबरोबर कोणाला आत येऊ दिले नाही. तिच्यासाठी सर्वजण रडत व शोक करत होते. पण तो म्हणाला,  रडू नका, कारण ती मेली नाही, झोपेत आहे.*

*तरी ती मेली हे ठाऊक असल्यामुळे ते त्याला हसू लागले. मग येशूने तिच्या हाताला धरून, मुली, ऊठ. असे मोठयाने म्हटले. तेव्हा तिचा आत्मा परत आला व ती तत्काळ उठली. मग तिला खाण्यास दयावे म्हणून त्याने आज्ञा केली.*

*घडलेली गोष्ट कोणाला सांगू नका अशी त्याने त्यांस आज्ञा केली. परंतु ही गोष्ट सर्व भागात पसरली.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** योहान 10:10

प्रभू परमेश्वरा, येशूमध्ये मिळणाऱ्या विपुल जीवनाबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. प्रत्येक  लेकराला तुझा आनंद व जीवनाचे पूर्णत्व देऊन तू आशीर्वादित कर. तू आम्हांला ज्या चांगल्या गोष्टी देतोस, त्या शत्रूला हिरावून घेता येऊ नयेत.

# KIDStory™

# पाठ 4
# अभिषिक्त

## लूक 7:36-50

### उजळणी :
ह्या मालिकेमध्ये आम्ही तीन गोष्टी सांगितल्या आहेत. त्यातील तुम्हांला कुठली गोष्ट आवडली? तुम्ही ती गोष्ट सांगू शकाल का?

### सुरुवातीचा प्रश्न :
असा कोणता मार्ग आहे ज्याद्वारे तुम्ही एखाद्याबद्दल आदर व सन्मान व्यक्त केला आहे?

### पुन्हा गोष्ट सांगणे :
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

### वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे
**बॉलचा खेळ :** गटातील लेकरांना गोलामध्ये बसवा. एक छोटा बॉल घ्या आणि तुम्ही 'जा' असे म्हटल्यावर तो लेकरांना पुढील लेकराकडे पास करू द्या. तुम्ही 'थांब' असे म्हटल्यावर ज्या लेकराकडे बॉल असेल त्याने गोष्टीतील पुढचा भाग सांगायचा. पूर्ण गोष्ट सांगून होईपर्यंत असेच खेळत राहा.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**
**डीव्हीडी** : खंड 5

- सुरुवात 16:20
- शेवट 18:49

**ओळख :**
येशू जेव्हा या पृथ्वीवर राहत होता, त्या काळी, जर तुमच्याकडे कोणी पाहुणा आला तर तुम्ही खूप आदराने त्याचा पाहुणचार करावा अशी अपेक्षा केली जात असे. तुम्ही त्यांचे प्रेमाने स्वागत करावे आणि त्यांनी तुमच्या घरात प्रवेश करण्यापूर्वी, त्यांचे पाय धुऊन स्वच्छ केले जातील याची खबरदारी घेण्याची गरज होती. जर तुम्ही या गोष्टी केल्या नाहीत तर ते खूपच उद्धटपणाचे लक्षण मानले जात असे.
अजून एक गोष्ट तुम्हांला जाणून घ्यायची आहे आणि ती म्हणजे संदेष्टा ही अशी व्यक्ती आहे जी देवाकडून ऐकते आणि देवाच्या वतीने बोलते.

***गोष्ट :***
*परूश्यातील कोणा एकाने त्याला आपल्या येथे भोजन करण्याची विनंती केली आणि तो त्या परूश्याच्या घरी जाऊन भोजनास बसला. तेव्हा पाहा, त्या गावात कोणीएक पापी स्त्री होती. तो परूश्याच्या घरात जेवायला बसला आहे हे ऐकून ती सुगंधी तेलाची अलाबास्त्र कुपी घेऊन आली. आणि त्याच्या पायाशी मागे रडत उभी राहिली व आपल्या आसवांनी त्याचे पाय भिजवू लागली. तिने आपल्या डोक्याच्या केसांनी ते पुसले, त्याच्या पायाचे मुके घेतले आणि त्यांना सुगंधी तेल लावले. तेव्हा ज्या परूश्याने त्याला बोलावले होते त्याने हे पाहून आपल्या मनात म्हटले, ''हा संदेष्टा असता तर आपल्याला शिवत असलेली स्त्री कोण व कशी आहे , म्हणजे ती पापी आहे, हे त्याने ओळखले असते.''*

*तेव्हा येशूने त्याला म्हटले, शिमोन, मला तुमच्याबरोबर काही बोलायचे आहे.*

**टीप :**
**कधीकधी तुमच्या घराभावती मिळालेला एखादा साधा टेकूसुद्धा गोष्ट अधिक जिवंत करू शकतो. आणि गोष्ट सांगत असताना लेकरांना लक्ष केंद्रित करायला काहीतरी मिळते.**

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*एका सावकाराचे दोन कर्जदार होते. एकाला पाचशे रूपये देणे होते व एकाला पन्नास होते. देणे फेडण्यास त्यांच्याजवळ काही नव्हते म्हणून त्याने त्या दोघांस ते सोडले. तर त्यातून कोणता त्याच्यावर अधिक प्रीती करील? शिमोनाने उत्तर दिले, ज्याला अधिक सोडले तो, असे मला वाटते. मग तो त्याला म्हणाला, बरोबर ठरवले.*

*तेव्हा त्याने त्या स्त्रीकडे वळून शिमोनाला म्हटले, तुम्ही ह्या बाईला पाहता ना? मी तुमच्या घरी आलो तेव्हा तुम्ही मला पाय धुण्यासाठी पाणी दिले नाही. परंतु हिने आसवांनी माझे पाय भिजवून आपल्या केसांनी ते पुसले. तुम्ही माझा मुका घेतला नाही. परंतु मी आत आल्यापासून हिने माझ्या पायांचे मुके घेण्याचे थांबवले नाही. तुम्ही माझ्या मस्तकाला तेल लावले नाही. परंतु हिने माझ्या पायांस सुगंधी तेल लावले. ह्या कारणास्तव मी तुम्हांला सांगतो, हिची जी पुष्कळ पापे आहेत, त्यांची क्षमा झाली आहे. कारण हिने फार प्रीती केली.  ज्याला थोडक्यांची क्षमा झाली आहे तो थोडकी प्रीती करतो.*

*मग त्याने तिला म्हटले, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.*

*तेव्हा त्याच्याबरोबर भोजनास बसलेले आपसात म्हणू लागले, पापांची क्षमादेखील करणारा हा कोण?*

*मग त्याने त्या स्त्रीला म्हटले, तुझ्या विश्वासाने तुला तारले आहे. शांतीने जा.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** कलस्सै 3:13–14

प्रभू, तू आम्हांला क्षमा केली असताना ह्या सर्व लेकरांना प्रीतीचे व क्षमेचे अंतःकरण देऊन आशीर्वादित कर. त्यांना इतरांना आशीर्वादित करण्याची इच्छा देऊन आशीर्वादित कर.

# पाठ 5
# लेकराचे जेवण

## लूक 9:10-17

**उजळणी :**
मागे सांगितलेल्या गोष्टी लेकरांना योग्य क्रमाने सांगता येतात का ते पाहा. त्यांना कुठली गोष्ट जास्त आवडली? का?

**सुरुवातीचा प्रश्न :**
तुम्हांला तुमचे जेवण किंवा काही पैसे देऊन एखाद्याला मदत करायला आवडेल का? का?

**पुन्हा गोष्ट सांगणे :**
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

**वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे**
**हाताच्या हालचाली :** गोष्ट पुन्हा वाचा आणि लेकरांना पुढे येऊन गोष्टीतील निरनिराळे भाग हातांच्या हालचाली करून सांगू द्या. मग लेकराला एक सहकारी निवडू द्या आणि एकमेकांना हातांच्या हालचाली करून गोष्ट सांगू द्या.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**
**डीव्हीडी :** खंड 6

- सुरुवात 22:12
- शेवट 25:19

**ओळख :**
येशू लोकांना शिकवत आहे आणि अनेक चमत्कार करत आहे. तो लोकांना आरोग्य देत आहे आणि सैतानाला निघून जाण्याची आज्ञा देत आहे. लोकांना त्याची शिकवण आवडत आहे. त्याला काही काळ त्याच्या शिष्यांबरोबर – त्याचे अनुकरण करण्यासाठी त्याने निवडलेले लोक – एकटे राहायचे आहे. तो कुठे गेला हे समजल्यावर लोकसमुदाय त्याच्यामागून गेला.

***गोष्ट :***
*तो प्रेषितांना बरोबर घेऊन बेथसैदा नावाच्या गावाकडे एकांत स्थळी गेला. हे समजल्यावर लोकसमुदाय त्याच्यामागून गेला. तेव्हा त्यांचे स्वागत करून तो त्यांच्याबरोबर देवाच्या राज्याविषयी बोलत होता आणि ज्यांना बरे होण्याची जरूरी होती त्यांना तो बरे करत होता.*

**टीप :**
**लेकरे काय सांगण्याचा प्रयत्न करत आहेत ते ऐकण्याचा प्रयत्न करा. तुम्हांला काय सांगायचे आहे ते पाहू नका तर लेकरांना काय सांगायचे आहे ते ऐका.**

*दिवस उतरू लागला तेव्हा तो बारा प्रेषित जवळ येऊन त्याला म्हणाले, लोकसमुदायाला निरोप द्या म्हणजे ते भोवतालच्या गावात व शेतमळ्यात जाऊन उतरतील व खाण्याची सोय करतील कारण आपण येथे रानातल्या ठिकाणी आहोत.*

*पण तो त्यांना म्हणाला, तुम्हीच त्यांना खाण्यास द्या.*

*ते म्हणाले, आम्ही जाऊन ह्या लोकांसाठी अन्न विकत आणले नाही तर पाच भाकरी व दोन मासे एवढ्याशिवाय आम्हांजवळ काही नाही. कारण ते सुमारे पाच हजार पुरूष होते.*

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*तेव्हा त्याने सर्वांस पन्नास पन्नास जणांच्या पंक्ती करून बसवले. तेव्हा त्याने त्या पाच भाकरी व ते दोन मासे घेऊन वर स्वर्गाकडे पाहून त्यांस आशीर्वाद दिला आणि त्यांचे तुकडे करून ते लोकसमुदायाला वाढण्याकरता शिष्यांजवळ दिले. तेव्हा सर्वजण जेवून तृप्त झाले आणि उरलेले बारा टोपल्या तुकडे त्यांनी उचलून घेतले.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** प्रेषित 2:44

प्रभू, तू आम्हांला खूप खूप आशीर्वादित केले आहेस. जेव्हा कुणाला गरज असेल तेव्हा त्यांना देण्याची इच्छा या लेकरांना देऊन तू त्यांना आशीर्वादित कर. संतोषाने देणारा तुला आवडतो. आम्ही जेव्हा देऊ शकतो तेव्हा तू आम्हांला आशीर्वादित करतोस म्हणून आम्ही तुझे आभार मानतो.

# पाठ 6
# ठेंगणा माणूस
## लूक 10:1-10

**उजळणी :**
मागील आठवड्यात लेकरांनी देवाचे अनुकरण कसे केले? त्यांचे वैयक्तिक प्रतिसाद काय होते? देवाने त्यांना जे करायला सांगितले त्यावर विश्वास ठेवून त्यांनी आज्ञापालन कोणत्या मार्गाने केले?

**सुरूवातीचा प्रश्न :**
तुमच्यासाठी दुसऱ्याला देण्याची सर्वात अवघड गोष्ट कोणती?

**पुन्हा गोष्ट सांगणे :**
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

**वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे**
**नाटक करणे :** गटातील लेकरांना गोष्टीतील निरनिराळी पात्रे रंगवायला द्या. त्यांना सरावासाठी थोडा वेळ द्या. मग त्यांना नाटक करून गोष्ट सांगू द्या.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**
**डीव्हीडी :** खंड 7

- सुरुवात 28:14
- शेवट 30:14

**ओळख :**
येशू यरूशलेमकडे निघाला आहे. जाता जाता तो यरीहो या गावात शेवटचे थांबतो. त्याला बघण्यासाठी लोकांची गर्दी जमली आहे. परंतु एक माणूस अतिशय झगडत आहे. त्याने काय केले ते आपण पाहूया.

***गोष्ट :***
*येशू यरिहो गावातून पुढे जात होता. तेव्हा पाहा, जक्कय नावाचा कोणीएक मनुष्य होता. तो मुख्य जकातदार असून श्रीमंत होता. येशू कोण आहे हे पाहण्याचा तो प्रयत्न करत होता. पण गर्दीमुळे त्याचे काही चालेना. कारण तो ठेंगणा होता. तेव्हा तो पुढे धावत जाऊन त्याला पाहण्यासाठी उंबराच्या झाडावर चढला कारण येशूला त्या वाटेने जायचे होते. मग येशू त्या ठिकाणी येताच दृष्टी वर करून त्याला म्हणाला, जक्कया, त्वरा करून खाली ये. कारण आज मला तुझ्या घरी उतरायचे आहे.*

*तेव्हा त्याने त्वरेने खाली उतरून आनंदाने त्याचे आगतस्वागत केले. हे पाहून सर्व लोक कुरकुर करू लागले की 'पापी मनुष्याच्या घरी हा उतरायला गेला आहे.'*

*तेव्हा जक्कय उभा राहून प्रभूला म्हणाला, प्रभुजी पाहा, मी आपले अर्धे द्रव्य दरिद्र्यांस देतो आणि मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करतो.*

*येशूने त्याला म्हटले, आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे कारण हाही अब्राहामाचा पुत्र आहे. कारण मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधण्यासाठी व तारण्यासाठी आला आहे.*

**टीप :**
**लेकरे काय सांगण्याचा प्रयत्न करत आहेत ते ऐकण्याचा प्रयत्न करा. तुम्हांला काय सांगायचे आहे ते पाहू नका तर लेकरांना काय सांगायचे आहे ते ऐका.**

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

***कथा पुढे चालू...***

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** 1 तीमथ्य 6:6–8

प्रभू, आम्हांला समाधानी ठेवून आशीर्वादित कर. प्रत्येक लेकराला उदार अंतःकरण देऊन आशीर्वादित कर, जेणेकरून दिल्याने तू आमच्या गरजा पूर्ण करतोस हे त्यांना समजावे आणि त्यांनी इतरांना आशीर्वादित करण्याची निवड करावी.

# पाठ 7
# विधवेचे दोन पैसे

लूक 21:1-4

## उजळणी :

मागे सांगितलेल्या गोष्टी लेकरांना सांगता येतात का ते पाहा. अनेक लेकरे देणारी आहेत. देव त्यांना देण्याबद्दल काय सांगतो ते शोधून काढा.

## सुरुवातीचा प्रश्न :

जर तुमच्याकडे 1000 रुपये असते तर तुम्ही त्याचे काय केले असते?

## पुन्हा गोष्ट सांगणे :

लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

## वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे

**सहकाऱ्याला सांगणे** : ही गोष्ट जरा लहान आहे. गटांमधील लेकरांच्या जोड्या बनवा. एक लेकरू त्याच्या सहकाऱ्याला गोष्ट सांगेन. त्यानंतर दुसरा सहकारी त्या लेकराला गोष्ट सांगेन. मग दोन जोड्या एकत्र करा. एक जोडी दुसऱ्या जोडीला गोष्ट सांगेन आणि त्यानंतर दुसरी जोडी पहिल्या जोडीला गोष्ट सांगेन.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**

**डीव्हीडी** : खंड 8

- सुरुवात 32:47
- शेवट 33:25

**ओळख :**

लेकरांशी ते मंडळीमध्ये आणत असलेल्या दानार्पणाविषयी चर्चा करा. तुम्ही खालील प्रश्न विचारू शकता.

- तुम्ही दानार्पण का आणता?
- तुम्ही कधीकधी किती दानार्पण देता?
- दानार्पणाचा उपयोग कशासाठी होतो याचा मी विचार करतो.
- आपण किती दानार्पण द्यावे असे देवाला वाटते याचा मी विचार करतो.

***गोष्ट :***

*एकदा येशू मंदिरामध्ये दानपात्राच्या शेजारी बसला होता. मग त्याने दृष्टी वर करून धनवानांना आपली दाने मंदिराच्या भांडारात टाकताना पाहिले. त्याने एका दरिद्री विधवेलाही तेथे दोन टोल्या टाकताना पाहिले. तेव्हा तो त्याच्या शिष्यांना म्हणाला, मी तुम्हांला खरे सांगतो, ह्या दरिद्री विधवेने सर्वांपेक्षा अधिक टाकले आहे. कारण त्या सर्वांनी आपल्या समृद्धीतून दानात टाकले. हिने तर आपल्या कमाईतून आपली सर्व उपजीविका टाकली आहे.*

*येशूने त्याला म्हटले, आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे कारण हाही अब्राहामाचा पुत्र आहे. कारण मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधण्यासाठी व तारण्यासाठी आला आहे.*

**टीप :**

**शांतता – शांततेला घाबरू नका. उत्तर कसे द्यावे ह्याविषयी लेकरांना विचार लेकरांना करू द्या. शांती असताना देवाच्या आत्म्याला कार्य करू द्या.**

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

*कथा पुढे चालू...*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** याकोब 1:27

प्रभू, आमच्या डोळ्यांना, कानांना आणि अंतःकरणाला आशीर्वादित कर जेणे करून आमच्या आजूबाजूच्या लोकांच्या गरजा आम्ही पाहाव्यात आणि तू आम्हांला जे द्यायला सांगतोस ते देण्याची आम्ही इच्छा धरावी.

# पाठ 8
# शेवटले भोजन
## लूक 22:7–23

### उजळणी :
मागील आठवड्यात सांगितलेली गोष्ट कोणाच्या लक्षात आहे? ती गोष्ट कोण सांगू शकेल?

### सुरुवातीचा प्रश्न :
तुम्हांला जे खायला हवे ते मिळाले असते तर ते काय असते?

### पुन्हा गोष्ट सांगणे :
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

### वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे
**रंगाकृती** : एक मोठा कागद घ्या तसेच रंगवण्याचे साहित्य घ्या. गोष्टीतील निरनिराळे भाग सांगणारे चित्र लेकरांना काढू द्या. वेळ मिळाला तर त्या चित्रांकडे पाहून लेकरांना गोष्ट सांगू द्या.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**
**डीव्हीडी** : खंड 9

- सुरुवात 34:54
- शेवट 36:44

**ओळख :**
वल्हांडण सण हा यहूद्यांसाठी विशेष सुट्टीचा दिवस असतो. देवाने यहूदी लोकांना अत्यंत कठीण परिस्थितीतून बाहेर काढले होते, त्याचे स्मरण करून आनंद करण्याचा हा काळ असतो. वास्तविक ते आजही तो दिवस साजरा करतात. यहूदी लोकांनी निर्दोष कोकऱ्याचे रक्त आपल्या घरांच्या दोन्ही दारबाह्यांना व चौकटीच्या कपाळपट्टीला लावल्यामुळे, मृत्यूदूत त्यांची घरे ओलांडून पुढे गेला असा वल्हांडण सणाचा अर्थ आहे. त्या दूताने ही घरी ओलांडून पुढे जावे म्हणून त्याच्यासाठी हे चिन्ह होते. येशूला जगाचे पाप हरण करणारा वल्हांडणाचा कोकरा म्हटले आहे. तो त्याच्या शिष्यांना व त्याच्या विश्वासू अनुयायांना हेच सांगण्याचा प्रयत्न करत होता की, तो काही काळानंतर मरणार आहे. तो आता त्याच्या शेवटच्या भोजनासाठी गोष्टींची तयारी करत आहे, तोच वल्हांडण सणाच्या भोजनाचा दिवस होता.

***गोष्ट :***
*नंतर ज्या दिवशी वल्हांडणाचा यज्ञपशू मारायचा तो बेखमीर भाकरीचा दिवस आला, तेव्हा त्याने पेत्र व योहान ह्यांना असे सांगून पाठवले की, 'आपण वल्हांडण सणाचे भोजन करावे म्हणून तुम्ही जाऊन आपल्यासाठी तयारी करा.'*

*ते त्याला म्हणाले, आम्ही त्याची तयारी कोठे करावी म्हणून आपली इच्छा आहे? त्याने त्याला सांगितले, पाहा, तुम्ही नगरात प्रवेश केल्यावर पाण्याची घागर घेऊन जाणारा एक माणूस तुम्हांला भेटेल. तो ज्या घरात जाईल त्यात त्याच्यामागून जा आणि त्या घराच्या धन्याला असे म्हणा. 'गुरूजी तुम्हांला विचारतात, मला माझ्या शिष्यांसह वल्हांडणाचे भोजन करता येईल अशी पाहुण्यांची खोली कोठे आहे? मग तो तुम्हांला सज्ज केलेली मोठी माडी दाखवील. तेथे तयारी करा.*

**टीप :**
**कधीकधी तुम्ही गोष्ट सांगत असताना लेकरांना डोळे मिटून घेऊ द्या. गोष्ट सांगितली जात असताना त्यांनी तिथे असण्याची कल्पना करण्यास त्यांना मदत होते.**

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*तेव्हा पेत्र व योहान गेले व त्याने सांगितल्याप्रमाणे त्यांस आढळले. आणि त्यांनी वल्हांडणाची तयारी केली.*

*नंतर वेळ झाली तेव्हा तो जेवायला बसला व त्याच्याबरोबर प्रेषितही बसले. तेव्हा तो त्यांना म्हणाला, मी दुःख भोगण्यापूर्वी हे वल्हांडणाचे जेवण तुमच्याबरोबर करावे अशी माझी फार उत्कट इच्छा होती कारण मी तुम्हांला सांगतो की, देवाच्या राज्यात हे पूर्ण होईपर्यंत मी हे भोजन पुन्हा करणार नाही.*

*मग त्याने भाकरी घेऊन व उपकारस्तुती करून ती मोडली आणि त्यांना देऊन म्हटले, हे माझे शरीर आहे. ते तुमच्यासाठी दिले जात आहे. माझ्या स्मरणार्थ हे करा. त्याप्रमाणे भोजन झाल्यावर त्याने प्याला घेऊन म्हटले, हा प्याला माझ्या रक्तात नवा करार आहे. ते रक्त तुमच्यासाठी ओतले जात आहे.*

(तुम्ही इथे थांबू शकता किंवा खालील वचनांची भर घालू शकता.)

*पण पाहा, मला धरून देणाऱ्याचा हात माझ्याबरोबर मेजावर आहे. मनुष्याचा पुत्र ठरल्याप्रमाणे जातो खरा. परंतु ज्याच्या हातून तो धरून दिला जातो त्या माणसाची केवढी दुर्दशा होणार! तेव्हा आपल्यापैकी जो असे करणार आहे तो कोण असावा, ह्याचा ते आपसात विचार करू लागले.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** 2 करिंथ.3:4–6

पित्या, या लेकरांना तुझ्या सामर्थ्याने आशीर्वादित कर जेणेकरून ते तुझे प्रतिनिधी बनतील. आणि तुझ्या चांगुलपणाबद्दल व मोठेपणाबद्दल इतरांना सांगतील. त्यांना येशूसाठी जगण्याचे धैर्य तू दे. पवित्र आत्म्या, त्यांना जीवन देऊन आशीर्वादित कर.

# पाठ 9
# येशूची परीक्षा
## लूक 23:13-25

### उजळणी :
आपण सांगितलेल्या गोष्टी तुम्ही इतरांना सांगू शकलात का? तो अनुभव कसा होता? त्यांची प्रतिक्रिया काय होती?

### सुरुवातीचा प्रश्न :
तुमच्या बाबतीत सर्वांत वाईट गोष्ट कोणती होऊ शकते? तुम्ही जी गोष्ट केली नाही त्याबद्दल तुम्हांला दोष लावणे, का तुमचे नाव घेतले जाणे?

### पुन्हा गोष्ट सांगणे :
लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

### वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे
**क्रमानुसार लावणे** : कागदाच्या प्रत्येक वेगळ्या तुकड्यावर गोष्टीतील भाग लिहून काढा. प्रत्येक लेकराला एकेक तुकडा द्या आणि त्यांना सर्व गोष्ट क्रमाने एकत्र करू द्या.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**
**डीव्हीडी** : खंड 10
- सुरुवात 42:55
- शेवट 44:18

**ओळख :**
येशूला अनेक सरकारी अधिकाऱ्यांसमोर आणले गेले. त्याने काहीच चूक केली नाही असा त्यांचा विश्वास होता. तो काय बोलला किंवा त्याने काय केले याबद्दल लोक खोटे बोलत होते. लोक येशूबद्दल जरी खोटे बोलत होते, तरी तो (येशू) काहीच बोलला नाही. आठवड्याच्या सुरूवातीला ते त्याला बघायला उत्सुक झाले होते, एवढेच नव्हे तर त्यांनी त्याची वरातच काढली. आता गोष्टी बदलल्या होत्या.

***गोष्ट** :*
*मग पिलाताने मुख्य याजक, अधिकारी व लोक ह्यांना एकत्र बोलावून म्हटले, हा मनुष्य लोकांस फितवणारा म्हणून ह्याला तुम्ही माझ्याकडे आणले आणि पाहा, ज्या गोष्टींचा आरोप तुम्ही ह्याच्यावर ठेवता त्यासंबंधी मी तुमच्यासमक्ष ह्याची चौकशी केल्यावर मला ह्या मनुष्याकडे काहीही दोष सापडला नाही. ह्याने मरणदंड भोगण्यासारखे काही केलेले नाही. म्हणून मी ह्याला फटके मारून सोडून देतो. (कारण वल्हांडण सणात त्याला त्यांच्याकरता एकाला सोडावे लागत असे.)*

*परंतु सर्वांनी एकच ओरडा करून म्हटले, ह्याची वाट लावा आणि आमच्यासाठी बरब्बाला सोडा.*

*येशूला सोडावे ह्या इच्छेने पिलाताने पुन्हा त्यांच्याबरोबर भाषण केले. तरी 'ह्याला वधस्तंभावर खिळा', 'ह्याला वधस्तंभावर खिळा', असे ते ओरडत राहिले.*

**टीप :**
**ही गोष्ट सांगत असताना तुमची कल्पनाशक्ती वापरा. गोष्टीतील व्यक्तीरेखांबरोबर तुम्ही आहात असे सोंग घ्या. तुम्ही काय पाहाता, ऐकता? तुम्हांला काय वाटते? तुम्हांला कशाचा वास येतो?**

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ____________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*तो त्यांना तिसऱ्यांदा म्हणाला, का बरे? त्याने काय वाईट केले आहे? त्याच्याकडे मरणदंड होण्यासारखा काही दोष मला सापडला नाही. म्हणून मी ह्याला फटके मारून सोडून देतो.*

*पण 'ह्याला वधस्तंभावर खिळा', असा त्यांनी मोठ्याने ओरडून आग्रह चालवला आणि त्यांच्या ओरडण्याला यश आले. तेव्हा त्यांच्या मागण्याप्रमाणे व्हावे असा पिलाताने निकाल दिला. त्याने बरब्बाला सोडून दिले आणि येशूला त्यांच्या मर्जीवर सोपवून दिले.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** – यशया 30:19

देवपित्या, तुझे सांत्वन देऊन ह्या लेकरांना आशीर्वादित कर. तुझा आवाज ऐकून त्यांना सांत्वन मिळावे आणि तुझे अनुकरण कसे करावे हे त्यांना कळावे.

# KIDStory

kids around the world

# पाठ 10
# येशू जिवंत आहे

## लूक 23:39–24:7

+6

**उजळणी :**

प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी आपण देव ह्या गोष्टीतून आपल्याला काय दाखवत आहे याबद्दल बोललो. देवाने तुम्हांला जे करायला सांगितले ते कोणत्या एका मार्गाने करून तुम्ही देवाचे आज्ञापालन केले आहे?

**सुरूवातीचा प्रश्न :**

तुम्ही कोणत्या गोष्टीने सर्वांत जास्त हुरळून जाता?

**पुन्हा गोष्ट सांगणे :**

लेकरांकडे जर पवित्र शास्त्र असेल तर त्यांना ते उघडू द्या व त्यांना प्रश्न विचारून, गाळलेल्या जागा भरून किंवा चुकीची वाक्ये दुरूस्त करून पुन्हा सर्व गोष्ट सांगा.

**वैयक्तिक/गटामध्ये पुन्हा गोष्ट सांगणे**

**बॉल उडवणे** : लेकरांना गोलात उभे करा. एका लेकराकडे बॉल द्या. तो गोष्टीतील पहिला भाग सांगेल. लेकरू तो बॉल दुसऱ्या लेकराकडे उडवेल जो गोष्टीतील पुढील भाग सांगेल. संपूर्ण गोष्ट सांगून होईपर्यंत असेच खेळत राहा.

**मुलांसाठी येशूची गोष्ट**

**डीव्हीडी** : खंड 9

- सुरुवात 34:54
- शेवट 36:44

**ओळख :**

येशूला वधस्तंभावर मरणदंडाची शिक्षा झाली आहे. त्याला पहारेकरी चाबकाचे फटके मारत आहेत. लोक त्याची निंदा करत आहेत. हा अतिशय वाईट दिवस आहे. जरी लोक त्याची निंदा करत आहेत, तरी येशू म्हणत आहे, हे बापा, त्यांना क्षमा कर. कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही. हा दिवस अजूनही 'उत्तम शुक्रवार'चा दिवस म्हणून ओळखला जातो. आता ही गोष्ट ऐका आणि मग आपण शोधून काढू की त्या दिवसाला तसे का म्हटले जाते.

***गोष्ट :***

*वधस्तंभावर खिळलेल्या त्या अपराध्यांपैकी एकाने त्याची निंदा करून म्हटले, तू ख्रिस्त आहेस ना? तर स्वतःला व आम्हांला वाचव.*

*परंतु दुसऱ्याने त्याचा निषेध करून म्हटले, तुलाही तीच शिक्षा झाली असता तू देवाला सुद्धा भीत नाहीस काय? आपली शिक्षा तर यथान्याय आहे. कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगत आहोत. परंतु ह्याने काही अयोग्य केले नाही. मग तो म्हणाला, अहो येशू, आपण आपल्या राजाधिकाराने याल तेव्हा माझी आठवण करा. येशू त्याला म्हणाला, मी तुला खचित खचित सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील.*

*आता सुमारे दोन प्रहर झाले आणि सूर्यप्रकाश नाहीसा होऊन तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशभर अंधार पडला. आणि पवित्रस्थानातील पडदा मधोमध फाटला. तेव्हा येशू उच्च स्वराने ओरडून म्हणाला, हे बापा, मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो. असे बोलून त्याने प्राण सोडला.*

**टीप :**

**गोष्ट सांगत असताना कधीकधी लेकरांना गोष्ट समजण्यासाठी चित्रांची मदत होते. तुम्ही बोलत असताना लेकरांना चित्रांच्या पवित्र शास्त्रातून चित्रे दाखवा किंवा बाहेरील पुस्तकातून किंवा मासिकातून चित्रे दाखवा. तुमच्याजवळ जे आहे त्याचा वापर करा.**

©Kids Around the World 2014

## प्रश्नांचा शोध :

- गोष्ट सांगत असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले?
- गोष्टीतील कोणता भाग तुम्हांला आवडला व त्यातील काय आवडले?
- गोष्टीतील एखादी गोष्ट समजायला अवघड होती का
- लोक कशाची निवड करतात? ते काय करू शकले असते? त्यांच्या निवडीचे काय परिणाम झाले?
- मी देवाबद्दल ... हे शिकलो. यामुळे तुमची देवाबद्दलची प्रीती व त्याची सेवा यामध्ये काय फरक पडतो?
- तुम्हांला अशा प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? आत्ता तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की जिथे देव तुम्हांला मदत करू शकतो?

## वैयक्तिक प्रतिसादाचे प्रश्न :

- तुम्ही आज जे काही शिकलात त्यावरून देव आज तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
- देव (पवित्र आत्मा) मला ... असे सांगत आहे असा माझा विश्वास आहे.
- आजच्या गोष्टीमध्ये ________ ही जशी देवाच्या गोष्टीचा भाग होती, तसे तुम्हीही त्याच्या गोष्टीचा भाग व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुम्ही देवाच्या गोष्टीचा भाग कसे होऊ शकता असे तुम्हांला वाटते?
- ह्या आठवड्यात तुम्ही ही गोष्ट कोणाला सांगणार?

## *कथा पुढे चालू...*

*तेव्हा जे झाले ते पाहून शताधिपतीने देवाचे गौरव करून म्हटले, खरोखर हा मनुष्य नीतीमान होता.*

*हे दृश्य पाहण्याकरता जमलेले सर्व लोकसमुदाय झालेल्या घटना पाहून ऊर बडवीत परत गेले. तेव्हा त्याच्या ओळखीचे सर्वजण व ज्या स्त्रिया त्याच्यामागे गालीलाहून आल्या होत्या त्या हे पाहत दूर उभ्या राहिल्या होत्या.*

*यहूद्यांच्या अरिमथाई नगरातला योसेफ नावाचा एक मनुष्य होता. तो न्यायसभेचा सदस्य असून सज्जन व धार्मिक होता. त्याने त्यांच्या विचाराला व कृत्याला परवानगी दिली नव्हती व तो देवाच्या राज्याची प्रतीक्षा करत होता. त्याने पिलाताकडे जाऊन येशूचे शरीर मागितले. ते त्याने खाली काढून तागाच्या वस्त्रात गुंडाळले व खडकात खोदलेल्या कबरीत ठेवले. ह्या कबरीत अद्याप कोणाला ठेवले नव्हते. गालीलातून त्याच्याबरोबर आलेल्या स्त्रियांनी त्याच्या मागून येऊन ती कबर पाहिली व त्याचे शरीर कसे ठेवले हेही पाहिले. मग त्यांनी परत जाऊन सुगंधी द्रव्ये व सुवासिक तेले तयार केली.*

*तो तयारी करण्याचा दिवस होता आणि शब्बाथ सुरू होणार होता. शब्बाथ दिवशी आज्ञेप्रमाणे त्या स्वस्थ राहिल्या.*

*मग आठवड्याच्या पहिल्या दिवशी मोठ्या पहाटेस आपण तयार केलेली सुगंधी द्रव्ये घेऊन त्या कबरीजवळ गेल्या. तो कबरीवरून धोंड लोटलेली आहे असे त्यांना आढळले. त्या आत गेल्यावर त्यांना प्रभू येशूचे शरीर सापडले नाही. मग असे झाले की, त्याविषयी त्यांना भ्रांत पडली, तो पाहा, लखलखीत वस्त्रे परिधान केलेले दोन पुरूष त्यांच्याजवळ उभे राहिले. तेव्हा भयभीत होऊन त्यांनी आपली तोंडे जमिनीकडे केली असता ते त्यांना म्हणाले, तुम्ही जिवंतांचा शोध मेलेल्यांमध्ये का करता? तो येथे नाही तर उठला आहे. तो गालीलात होता तेव्हाच त्याने तुम्हांला काय सांगितले ह्याची आठवण करा. ते असे की, मनुष्याच्या पुत्राला पापी जनांच्या हाती धरून देण्यात यावे, त्याला वधस्तंभावर खिळण्यात यावे व तिसऱ्या दिवशी त्याने पुन्हा उठावे, ह्याचे अगत्य आहे.*

## समाप्तीची प्रार्थना

**वाचा** योहान 3:16–17

हे सर्वसमर्थ देवा, आमच्यासाठी येशूला पाठवलेस म्हणून तुझे आभार मानतो. आम्ही तुझे आभार मानतो की तो इथून पुढे मेलेला नाही तर जिवंत आहे! तू ह्या लेकरांवर किती प्रीती करतोस व तुला त्यांच्याबरोबर राहायला किती आवडते ह्याची त्यांना जाणीव करून देऊन त्यांना आशीर्वादित कर.

# किड्स अराउंड द वर्ल्ड

www.katw.net/kidstory